सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

**मुख्य कार्यालय**

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई 400001 ☎ 2267 0210 /148 /248,22102222 फॅक्स : 22673915

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 22670210/148/248, 22102222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

विक्रीकर भवन, 9 वा मजला,रुम नंबर 915, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई 400203 ☎ 23742191 फॅक्स : 23781061

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 ☎ 23742191 Fax : 23781061

**ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**

## पोलीस उपनिरीक्षक (पूर्व) परीक्षा -२०१२

**क्रमांक १४४२(१)(१)/२०१२/तीन जाहिरात क्रमांक : २२३ /२०१२**

आयोगातर्फे पोलीस उपनिरीक्षक (पूर्व) परीक्षा-२०१२ **रविवार दिनांक २२ एप्रिल, २०१२ रोजी** महाराष्ट्रातील विविध ३५ जिल्हाकेंद्रावर घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | **पोलीस उप निरीक्षक** (एकूण ६०० पदे) | २८६ | ७९+४* | ४३+३* | १६ | ६ | ४ | १७ | ११+१३* | ११०+८* |
| | **महिला -** | ८६ | २५ | १४ | ५ | २ | १ | ५ | ७ | ३५ |
| | **खेळाडू -** | १४ | ४ | २ | १ | ० | ० | १ | १ | ६ |

**२.१** * अशी खूण केलेली पदे अनुशेषाची आहेत.

**२.२** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.३** महिलांसाठी व खेळाडंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**२.३** महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/ का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**२.५** खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**३. वेतनश्रेणी** :- रु. ९,३००-३४,८००(ग्रेड पे- ४,३००) अधिक भत्ते एकूण वित्तलब्धी अंदाजे रु. २१,७५२/-

**४. पात्रतेच्या अटी** :-

४.१ भारतीय नागरिकत्व.

४.२ **वयोमर्यादा - १ जुलै, २०१२** रोजी किमान **१९ वर्षे** असावे व **२८ वर्षापेक्षा** (**मागासवर्गाकरिता ३१ वर्षापेक्षा**) जास्त नसावे.

४.३ **उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम** :-

४.३.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांकरिता **३ वर्षांपर्यंत** शिथिलक्षम राहील.

४.३.२ पात्र खेळाडूंच्या बाबतीत **५ वर्षांपर्यंत**.

४.३.३ पोलीस उपनिरीक्षक हे पद शासनाने गट-ब (अराजपत्रित) संवर्गात समाविष्ट केली असल्यामुळे सदर पदांसाठी शासनाने माजी सैनिकांसाठी आरक्षण विहित केलेले नाही. माजी सैनिकांच्या आरक्षणासंदर्भात उच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे.

४.३.४ माजी सैनिकांसाठी उच्च वयोमर्यादा शासकीय आदेशानुसार शिथिलक्षम राहील.

४.३.५ आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ठ अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षाने शिथिल केली जाईल.

४.४ **शैक्षणिक अर्हता** :-

४.४.१ मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीच्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

४.४.२ मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

४.४.३ जे उमेदवार पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसले आहेत असे उमेदवार सुध्दा या पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१२ करिता अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांनी पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा- २०१२ परीक्षेची माहिती स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यन्त पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

४.४.४ ज्या पदवीसाठी अंतर्वासिता (INTERNSHIP) निर्धारित केली असेल अशी पदवी धारण करणा-या उमेदवारांनी अंतर्वासिता मुख्य परीक्षेची माहिती स्वीकारण्याच्या अंतिम तारखेपूर्वी पूर्ण केली असेल तरच त्याला पदवीधर समजण्यात येईल.

४.५ **शारीरिक पात्रता** :-

४.५.१ **पुरुषांसाठी** : - उंची १६५ से.मी. (अनवाणी) छाती किमान ७९ सें.मी. आणि फुगवून ८४ से.मी. (विस्तार ५ से.मी.)

४.५.२ **महिलांसाठी** :- उंची १५७ सें.मी. (अनवाणी)

**५. अपंग आरक्षणाबाबत** :- अपंग उमेदवार पात्र नाहीत.

६. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना** " तसेच " **परीक्षा** " या विभागातील "पोलीस उपनिरीक्षक परीक्षा" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

७. पोलीस उपनिरीक्षक पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८. प्रस्तुत पदांना शासनाने दि. ८ जून, २०१० रोजी निर्गमित केलेली "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१०" लागू आहे.

९. **पोलीस उपनिरीक्षक या पदावर निवड झालेल्या उमेदवारांची प्रशिक्षण कालावधित अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस उपनिरीक्षक या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा शासनास योग्य वाटेल अशा कारणांव्यतिरिक्त सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवारांकडून प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च आणि प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्त्यासहित संबंधित उमेदवारांकडून वसूल करण्यात येईल, अशा प्रकारचे बंधपत्र (बॉंड / हमीपत्र) संबंधित उमेदवारांकडून घेण्यात येईल**.

१०. **शुल्क** :

**१०.१** अमागास -रु. **२६०/-** **१०.२** मागासवर्गीय - रु. **१३५/-**

१०. **अर्ज करण्याची पद्धत** :-

**१०.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**१०.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ७ मार्च, २०१२ ते २८ मार्च, २०१२** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

**१०.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

**१०.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**१०.५** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-
(**१**) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (**२**) क्रेडिट कार्ड (**३**) डेबिट कार्ड (**४**) नेटबँकिंग (**५**) कॅश कार्ड

**१०.६** भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरल्यावर दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर (Working Days) उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त् होईल.

**१०.७** विहित पद्धतीने अर्ज सादर करुन परीक्षा शुल्क क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डद्वारे भरल्यानंतर उमेदवारांच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (Payment Received) एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

**१०.८** दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर आयोगाकडून एस.एम.एस. प्राप्त न झाल्यास अथवा प्रोफाईलद्वारे सूचना प्राप्त न झाल्यास ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या Feedback द्वारे Registration ID, Transaction ID व चलनावरील बँकेत रक्कम भरल्याचा दिनांक पाठवावा.

**१०.९** प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१०.१०** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**११.** विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची अथवा क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डद्वारे रक्कम भरण्याची कार्यवाही दिनांक २८ मार्च, २०१२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**१२.** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २९ मार्च, २०१२ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे.

मुंबई :
दिनांक : **७ मार्च, २०१२**

**दी. प्र. मिरजकर**
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग